**प्रेस नोट दिनांक २०/४/२०१९**

**उत्तमनगर पोलीस ठाणे पुणे शहर**

**<u>हरविलेल्या मुलीस तिचे पालकांचा शोध घेवून त्यांचे ताब्यात दिलेबाबत.</u>**

दिनांक १७/४/२०१९ रोजी १९.३० वा.च्या सुमारास इसम नामे दिपक गोपाळ निंबाळकर रा.सरस्वतीनगर सई निवास उत्तमनगर व त्यांचे बरोबरील दोन इसमांना एक अडीच वर्षांची मुलगी उत्तमनगरच्या दिशेने काही तरी खात खात चालत असताना दिसली. वरील इसमांनी त्या मुलीस उत्तमनगर पोलीस ठाणे येथे म.पो.हवा.वर्षाराणी देसाई व म.पो.शि.तेजश्री रणदिवे यांच्याकडे हजर केली.त्यांनी सदर मुलीकडे चौकशी केली असता त्या मुलीस काहीही बोलता येत नव्हते.म्हणून म.पो.हवा.देसाई व म.पो.शि.रणदिवे यांनी सदर मुलीचा मोबाईलवर फोटो घेवून तो मार्शल्स यांना व्हॉटस अप वर पाठविला.त्यावेळी मार्शल्स यांनी पो.स्टे.हद्दीत देशमुखवाडी येथे चौकशी केली असता तेथे वरील मुलीचा फोटो स्थानिक लोकांनी ओळखून तो सौ.श्रीदेवी काशिनाथ हरळीकर यांचे मुलीचा असलेचे सांगितल्याने त्यांस पोलीस ठाण्यास आणण्यात येवून मुलीस सुखरूप आईचे ताब्यात दिले.